# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u>** :- मनपा संचालीत सर्व शाळांमधून इयत्ता १० च्या शालांत प्रमाणपत्र
**{ शिक्षण विभाग }** परीक्षेमधून उत्तीर्ण (मार्च २०२५) झालेल्या गुणानुक्रमे प्रथम ५० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत.

मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका नागपूर यांचे दिनांक ०२/०५/२०२५ च्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार CET/JEE/NEET च्या वर्गाच्या शिकवणीकरीता मनपा शाळेत इयत्ता १० च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमधून उत्तीर्ण (मार्च २०२५) झालेल्या प्रथम ५० विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी मध्ये प्रथम टप्पा रूपये २५०००/- व इयत्ता १२ वी मध्ये व्दितीय टप्पा रूपये २५०००/- असे एकुण रूपये ५००००/- समाज विकास विभागामार्फत देण्याचे पारीत ठराव क्र. १३१/ स्थायी समिती/प्रशासक; दिनांक १८/०६/२०२५ मध्ये नमुद आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका नागपूर यांचे दिनांक ०४/११/२०२५ च्या आदेशान्वये सदर योजना मनपा शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांना वर्ग ११ व १२ मध्ये शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. यामध्ये मनपा संचालीत सर्व शाळांमधून इयत्ता १० च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमधून उत्तीर्ण (मार्च २०२५) झालेल्या गुणानुक्रमे प्रथम ५० विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी मध्ये प्रथम टप्पा रूपये २५०००/- व इयत्ता १२ वी मध्ये व्दितीय टप्पा रूपये २५०००/- असे एकुण रूपये ५००००/- समाज विकास विभागामार्फत देण्याचे निर्देशीत आहे. सदर लाभ कला, वाणिज्य व विज्ञान यापैकी कोणत्याही शाखेत प्रवेश घेतला असेल तरीही देण्यात यावा, असे निर्देशित आहे.

करीता नागपूर महानगरपालिका संचालीत सर्व शाळांमधून इयत्ता १० च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमधून उत्तीर्ण (मार्च २०२५) झालेल्या गुणानुक्रमे प्रथम ५० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे मान्यतेस्तव ठरावाचे प्रारूप सादर करण्यात येत आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 68/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 11/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मनपा संचालीत सर्व शाळांमधून इयत्ता १० च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमधून उत्तीर्ण (मार्च २०२५) झालेल्या गुणानुक्रमे प्रथम ५० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत.

मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका नागपूर यांचे दिनांक ०२/०५/२०२५ च्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार CET/JEE/NEET च्या वर्गाच्या शिकवणीकरीता मनपा शाळेत इयत्ता १० च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमधून उत्तीर्ण (मार्च २०२५) झालेल्या प्रथम ५० विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी मध्ये प्रथम टप्पा रूपये २५०००/- व इयत्ता १२ वी मध्ये व्दितीय टप्पा रूपये

२५०००/- असे एकुण रूपये ५००००/- समाज विकास विभागामार्फत देण्याचे पारीत ठराव क्र. १३१/ स्थायी समिती/प्रशासक ; दिनांक १८/०६/२०२५ मध्ये नमुद आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका नागपूर यांचे दिनांक ०४/११/२०२५ च्या आदेशान्वये सदर योजना मनपा शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांना वर्ग ११ व १२ मध्ये शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. यामध्ये मनपा संचालीत सर्व शाळांमधून इयत्ता १० च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमधून उत्तीर्ण (मार्च २०२५) झालेल्या गुणानुक्रमे प्रथम ५० विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी मध्ये प्रथम टप्पा रूपये २५०००/- व इयत्ता १२ वी मध्ये व्दितीय टप्पा रूपये २५०००/- असे एकुण रूपये ५००००/- समाज विकास विभागामार्फत देण्याचे निर्देशीत आहे. सदर लाभ कला, वाणिज्य व विज्ञान यापैकी कोणत्याही शाखेत प्रवेश घेतला असेल तरीही देण्यात यावा, असे निर्देशित आहे.

करीता नागपूर महानगरपालिका संचालीत सर्व शाळांमधून इयत्ता १० च्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेमधून उत्तीर्ण (मार्च २०२५) झालेल्या गुणानुक्रमे प्रथम ५० विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.